| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | बिगरपरवाना निवासी बांधकामांचे अवैध बांधकाम शास्तीकर समायोजनबाबत.. |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/०९/कावि/१२९ /२०२१, दिनांक - ०७/०४/२०२१ |
| विषय | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बिगरपरवाना निवासी बांधकामांचे अवैध बांधकाम शास्तीकर समायोजनबाबत (१००० चौ.फुटापर्यंतच्या मिळकतीकरिता) |
| अंमलबजावणी कालावधी | दिनांक ०४/०१/२००८ पासून |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी व वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १. नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.३०५/नवि-२०, दिनांक ११ जानेवारी २०१७<br>२. नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.३०५/नवि-२०, दिनांक २८ फेब्रुवारी २०१७<br>३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार क्रमांक ८६, दिनांक १०/०८/२०१८<br>४. मनपा परिपत्रक क्र. कर/मुख्य/०५/कावि/ ५९७ /२०१८, दिनांक १७/१०/२०१८<br>५. नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक पीसीसी-३०१९/ प्र.क्र.१०६/नवि-२२, दिनांक ८ मार्च, २०१९<br>६. मनपा परिपत्रक क्र. कर/मुख्य/०९/कावि/ २३४ /२०१९, दिनांक ०८/०३/२०१९<br>७. मनपा परिपत्रक क्र. कर/मुख्य/०९/कावि/ ३१६ /२०१९, दिनांक २२/०७/२०१९<br>८. नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक पीसीसी-३०१९/ प्र.क्र.१०६/नवि-२२, दिनांक १९जून २०१९<br>९. मनपा परिपत्रक क्र. कर/मुख्य/०९/कावि/ १३० /२०२०, दिनांक २८/०५/२०२०<br>१०.आदेश क्र. कर/मुख्य/०१/कावि/ १३५ /२०२०, दिनांक २९/०५/२०२०<br>११.करसंकलन विभागाचा दिनांक ०६/०४/२०२१ रोजीचा मंजूर प्रस्ताव |

आदेश,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७अ मधील तरतूदीनुसार महापालिका हद्दीतील दिनांक ०४/०१/२००८ रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ता करांचे दुपटी इतकी अवैध बांधकाम शास्ती सन २०१२-२०१३ पासून आकारणी करुन वसूल करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील संदर्भीय १ ते ३, ५ तसेच ८ चे शासन निर्णय / पत्रानुसार महापालिका कार्यक्षेत्रातील अवैध बांधकामांचे शास्ती कर आकारणीबाबत वेळोवेळी कार्यवाही करणेत आलेली आहे.

नगरविकास विभागाकडील शासन पत्र दिनांक ८ मार्च २०१९ नुसार ज्या मिळकतधारकांना शास्तीकरात सूट दिली आहे परंतु दिनांक ८ मार्च २०१९ पूर्वी ज्यांनी शास्ती कराची रक्कम भरणा केलेली आहे अशा भरणा केलेल्या शास्ती रकमेचे समायोजन संदर्भीय ९ चे महापालिका परिपत्रक क्रमांक ...

कृपया मागे पहा.....

कर/मुख्य/०९/कावि/ १३० /२०२०, दिनांक २८/०५/२०२० नुसार करणे आवश्यक आहे. समायोजन करावयाचे रकमेची माहिती संबधित विभागीय कार्यालय, तसेच क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून तपासणी व सांक्षाकित करुन हॉर्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीमध्ये सादर केलेली आहे.विभागीय कार्यालयांकडून प्राप्त १६ समायोजन तक्ते अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर. त्यानुसार तूर्त १००० चौरस फूट बिगरपरवाना निवासी मिळकतींची मिळकतनिहाय व वर्षनिहाय देय असलेली,भरणा केलेली व समायोजित करावयाची रक्कम निश्चित करणेत आलेली आहे.त्यानुसार करसंकलन विभागाकडील सॉफटवेअर व विभागीय कार्यालयाकडील प्राप्त माहितीनुसार खालील नमूद प्रमाणे समायोजन रकमेचा तपशील आढळून येत आहे.

**1000 चौरस फूट बिगरपरवाना निवासी बांधकाम मिळकतधारकांनी भरणा केलेल्या अवैध बांधकाम शास्ती रक्कमेचा समायोजन तपशील**

| झोन क्रमांक | विभागीय कार्यालय | अवैध बांधकाम शास्ती भरणा केलेल्या मिळकतींची संख्या | पैकी अवैध बांधकाम शास्ती समायोजन करावयाचे मिळकतींची संख्या | एकूण अवैध बांधकाम शास्ती भरणा रक्कम रुपये | एकूण अवैध बांधकाम शास्ती समायोजन करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निगडी प्राधिकरण | 2028 | 2023 | 37859253 | 37235807 |
| 2 | आकुर्डी | 1024 | 996 | 21996718 | 21996718 |
| 3 | चिंचवड | 2579 | 2519 | 53152016 | 53152016 |
| 4 | थेरगाव | 3809 | 3744 | 88872819 | 82363015 |
| 5 | सांगवी | 8242 | 7889 | 246123018 | 213450123 |
| 6 | पिंपरीवाघेरे | 621 | 606 | 16382817 | 14858628 |
| 7 | पिंपरीनगर | 221 | 215 | 5336163 | 5327719 |
| 8 | मनपाभवन | 1036 | 1001 | 23946858 | 21495103 |
| 9 | फुगेवाडी दापोडी | 629 | 609 | 12559036 | 12559036 |
| 10 | भोसरी | 1772 | 1729 | 34195434 | 34195434 |
| 11 | च-होली | 607 | 593 | 8250966 | 7646175 |
| 12 | मोशी | 1032 | 1006 | 14094957 | 13731189 |
| 13 | चिखली | 2546 | 2518 | 31650759 | 28908358 |
| 14 | तळवडे | 1028 | 993 | 12346008 | 12346008 |
| 15 | किवळे | 1036 | 1015 | 19649952 | 19649952 |
| 16 | दिघी बोपखेल | 2187 | 2134 | 53223470 | 49037534 |
| | एकूण | 30397 | 29590 | 679640244 | 627952815 |

सबब नगरविकास विभागाकडील शासन पत्र दिनांक ८ मार्च २०१९ नुसार ज्या निवासी मिळकतधारकांना शास्तीकरात सूट मिळाली आहे व दिनांक ८ मार्च २०१९ पूर्वी ज्यांनी शास्ती कराची रक्कम भरणा केलेली आहे अशा १००० चौरस फुटापर्यंतच्या अवैध बांधकाम शास्ती लागू असलेल्या निवासी मिळकतींचे शास्तीकर समायोजनाबाबत खालील नमूद प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

1. उपरोक्त वरील तक्त्यामध्ये नमूद केलेनुसार तूर्त १००० चौ.फुटापर्यंतच्या निवासी अवैध बांधकाम मिळकतधारकांची अवैध बांधकाम शास्ती समायोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

कृपया पुढील पानांकावर...

2. समायोजित करावयाची अवैध बांधकाम शास्ती कराची रक्कम सन २०२१-२०२२ चे बिलापासून प्रतिवर्षी पुढे सदर रक्कम शून्य (zero)होईपर्यंत समायोजन करणेची कार्यवाही करावी.त्यानुषंगाने संगणक प्रणालीमध्ये आवश्यक बदल / दुरुस्ती करणेत यावी.
3. संबधित अवैध बांधकाम मिळकतींचे शास्ती रक्कम समायोजनची कार्यवाही रकमेची माहिती ही संबधित मिळकतधारकास करसंकलन विभागाने विहित केलेल्या नमुन्यातील नोटीसमध्ये नमूद करून संबधित मिळकतधारकास नोटीस समक्ष बजावून त्याची स्थळप्रत मूळ नस्तीमध्ये समाविष्ट करणेत यावी.
4. देय अवैध शास्तीकर समायोजनाचा विभागीय कार्यालय व गटनिहाय संपूर्ण तक्ता संबधित सहाय्यक मंडलाधिकारी व गटप्रमुख तसेच संबधित गटसमन्वयक (मुख्य कार्यालय)यांनी स्वतंत्ररित्या S O FILE जतन करावी.तसेच दरवर्षी मान्यतेनुसारच समायोजन होत असलेबाबत तपासणी करून दरवर्षी ३० जून पूर्वी अंमलबजावणी (effect) करणेत यावी व तसा गटनिहाय प्रमाणपत्र १५ जुलै पर्यंत सहा.मंडलाधिकारी,प्रशासन अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने गटसमन्वयक यांचेकडे देणेत यावा.
5. प्रस्तुत आदेशातील नमूद निवासी मिळकतींचे शास्तीकर समायोजन करताना ज्या मिळकतीचे हरकत अर्ज प्राप्त होतील त्यावर सुनावणी इत्यादी नियमित कार्यवाही करून अंतरिम निर्णय घेणेचे अधिकार संबधित विभागीय कार्यालयांचे क्षेत्रीय अधिकारी यांना देणेत येत असून अंतिम मान्यता घेणेचे अधिकार उपायुक्त,करसंकलन यांचेकडे राहतील.
6. १००० चौ.फुटापर्यंतच्या निवासी अवैध बांधकाम मिळकतधारकांमधील काही मिळकती व त्यांची समायोजित करावयाची शास्तीकर रक्कम याबाबत ताळमेळ घेणेची कार्यवाही सुरु असलेने,सदर कार्यवाही पूर्ण झालेनंतर अशा मिळकतींची (अंदाजे ८०७ )तपासणी / खातरजमा पूर्ण झालेनंतर स्वतंत्रपणे मान्यता घेणेत यावी.
7. समायोजनाची माहिती संबधित मिळकतधारकांना अवगत करणेकामी आवश्यक ते बदल मिळकतकर बिलामध्ये करणेत यावेत.
8. १००० ते २००० चौ.फुटापर्यंतच्या निवासी अवैध बांधकाम शास्तीकर रकमेची तपासणी/ताळमेळ/खातरजमा करणेची कार्यवाही चालू असलेने सदर कार्यवाही पूर्ण होताच तात्काळ अंतिम निर्णयार्थ माझेकडे प्रस्ताव सादर करावा.

प्रस्तुत आदेश सर्व संबधित गटप्रमुख यांना बजावून सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.

06/04/21

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

सोबत - नोटीस प्रारूप

प्रति,

१. माहिती व तंत्रज्ञान विभाग / प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि. / बिल क्लाऊड

२/- उक्त आदेशानुसार मिळकतकर संगणक प्रणालीमध्ये तात्काळ आवश्यक व अचूक बदल करणेत यावे.

२. सर्व क्षेत्रीय अधिकारी /प्रशासन अधिकारी / सहाय्यक मंडलाधिकारी/ विभागीय कार्यालय /गटप्रमुख

३/- उपरोक्त मुद्दा क्रमांक ३ नुसार मिळकतधारकांना नोटीस बजाविताना सदर मिळकती निवासी असलेबाबत खातरजमा करणेत यावी.

३. सर्व गट समन्वयक (मुख्य कार्यालय)